N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** वरोरा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0413 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/06/2022 20:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 23/06/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/06/2022
   **Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/06/2022 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 043 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2022 20:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महावितरण कार्यालय वरोरा, बोर्डा ,वरोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भुषन ज्ञानेश्वर zile

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | व्होलटॉस सागर कॉलनी ,मालविया वार्ड वरोरा,वरोरा,वरोरा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | व्होलटॉस सागर कॉलनी ,मालविया वार्ड वरोरा,वरोरा,वरोरा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7709387897

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीनुबाबु अप्पालुस्वामी चुक्का | | | 1. गजरैयनी वलसा ,बांडेंगी ,BADANGI, विजाना ग्राम,अंध्रप्रदेश,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | मिटर बील बाबत अर्ज | 0.) |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी | 6,00[illegible] |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 6,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद पो.स्टे वरोरा दिनांक 27/06/2022 मी भुषन ज्ञानेश्वर झिले, वय 27 वर्षे, धंदा खाजगी इलेक्ट्रिशिन (सोलस सिस्टम) रा.व्होलटस सागर कलनी, मालविया वार्ड, वरोरा तह वरोरा जि. चंद्रपुर, दिनांक 23/06/2022 रोजी दुपारी 14.00 वा. ला.प्र.वि. चंद्रपूर येथे जावुन लाच रक्कमेच्या मागणी बाबत तक्रार केलेली आहे ती तक्रार खालील प्रमाणे- सविनय विनंती या प्रमाणे आहे की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन एन.डी. पावर सोल्युशन (सोलर सिस्टम फिटींग) व इलेक्ट्रिशिन चे काम मागील 04 वर्षापासुन करीत आहे व त्या कंत्राटी कामाकरीता शासकिय परवाना सन 2018 मध्ये काढण्यात आलेला आहे. मी वरोरा (बोर्डा) येथील 1) सौ. ऐश्वर्या वसंत खामनकर 2) श्री. वसंत पांडुरंग खामनकर दोन्ही रा. विकास नगर, बोर्डा, वरोरा 3) श्री. किशोर गोसाई ठोंबरे रा. कटारीया ले-आउट, वरोरा ता. वरोरा शहर जि. चंद्रपूर या तिन्ही ग्राहकांच्या घरी विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावण्याचे काम घेतले होते. त्याकरीता वरील तिन्ही ग्राहकांकडुन विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावण्याकरीता सर्वप्रथम M.S.E.B. वरोरा या कार्यालयातुन तिन्ही ग्राहकांचे डिमांड काढणे आवश्यक होते. त्याकरीता लागणारे फार्म भरुण व कागदपत्रे तयार करुन मी दिनांक 02/06/2022 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. वरोरा. M.S.E.B. या कार्यालयात सादर केलेला होता.मी दिनांक 22/06/2022 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. वरोरा या कार्यालयात जावुन तेथील सहाय्यक अभियंता श्री. चुक्का साहेब यांना जावुन भेटलो व वर नमुद तिन्ही ग्राहकांच्या घरी विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावण्याच्या कामाकरीता लागणारे डिमांड काढणे करीता अर्ज व कागदपत्रे सादर केली होती त्याबाबत विचारपुस केली. तेव्हा M.S.E.B. वरोरा येथील सहाय्यक अभियंता श्री. चुक्का साहेब यांनी मला सांगीतले की, जर तुला वर नमुद तीन्ही ग्राहकांचे विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावणे करीता डिमांड काढायचे असेल तर तुला माझेकरीता 6,000/रु. दयावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी त्यांना म्हणालो कि, डिमांड काढुन देण्याकरीता कोणतेही चार्जस लागत नाही. डिमांड निघाल्यानंतर लोड किलो वॉटच्या पावतीनुसार पैसे भरावे लागतात. त्यामुळे तुम्ही ऐवढे पैसे कश्याकरीता घेत आहे. तेव्हा M.S.E.B. वरोरा येथील सहाय्यक अभियंता श्री. चुक्का साहेब यांनी सांगीतले कि, तुला माझेकरीता 6,000/रु. दयावे लागतील तेव्हाच तुला तिन्ही ग्राहकाचे डिमांड काढुन देणार अन्यथा काढुन देणार नाही असे सांगीतल्याने मी नाईलाजास्तव त्यांना होकार देवुन तेथुन निघुन गेलो. परंतु M.S.E.B. वरोरा येथील श्री. चुक्का साहेब, सहाय्यक अभियंता, यांना 6,000 रूपये/-लाचरक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दि. 23/06/2022 रोजी 14.00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे येवुन सदरची तक्रार तुम्हाला देत आहे. तरी माझ्या तिन्ही ग्राहकांच्या घरी विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावणे करीता त्यासाठी लागणारे डिमांड काढुन देण्याच्या कामाकरीता 6,000/-रुपये लाचेची मागणी करणारे श्री. चुक्का साहेब, सहाय्यक

अभियंता, M.S.E.B. वरोरा यांचेविरूध्द कार्यवाही होण्यास विनंती आहे. श्री. चुक्का साहेब, सहाय्यक अभियंता, M.S.E.B. वरोरा यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण घेवाण नाही. सदर लाच रक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम हि माझे वैयक्तीक बचतीतुन जमा झालेले 6,000/- रू. आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्या करीता देत आहे. यानंतर दिनांक 23/06/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी 15/10 वा. दरम्याण त्यांचे कार्यालयात हजर असलेले पोलीस शिपाई वैभव गाडगे यांना बोलावुन मा. प्राचार्य, शासकिय औद्योगीक प्रशिक्षण संस्था चंद्रपुर यांचे नावे पत्र देउन दोन पंच आणणे करीता रवाना केले. त्यांनतर अदांजे 15:55 वा. दरम्याण पोलीस शिपाई वैभव गाडगे दोन पंचासह ला.प्र.वि. चंद्रपुर कार्यालयात परत आले व त्या पंचाना पोलीस निरीक्षक श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी त्याचे नावे गाव विचारुन माझी त्याचेशी व स्टॉफची ओळख करुन दिली. त्यांनतर श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी दिलेल्या सुचने वरुन पोक. रविकुमार ढेंगळे यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) जि. चंद्रपूर येथे जावुन करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती. शिल्पा भरडे मडम यांनी माझे कडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 6,000/- (रू.500/- दराच्या 12 चलनी नोटा) माझ्याकडुन घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन लाचेच्या रकमेस अँथ्रसिन पावडर लावली. त्यानंतर त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यांनतर मी पोलीस निरीक्षक श्रीमती.शिल्पा भरडे मडम यांना उशिर झाला असल्याने दिनांक 23/06/2022 रोजी M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) जि. चंद्रपुर येथे जावुन गै.अ. चुक्का साहेब यांची भेट होणे शक्य नसल्याचे सांगुन दि. 23/06/2022 रोजी कार्यवाही स्थगित ठेउन पुढील कार्यवाही दि. 24/06/2022 रोजी सकाळी 10.00 वा. करण्याचे ठरविले. श्रीमती. भरडे मडम यांनी लाच रक्कमेचा लिफाफा आपल्या ताब्यात ठेवुन याबाबतच्या सविस्तर नोंदी त्यांनी त्यांच्या पंचनाम्या मध्ये घेतल्या आहे- त्यांनतर दिनांक 24/06/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती. शिल्पा भरडे मडम यांनी दिनांक 23/06/2022 रोजी ठरल्याप्रमाने त्यांचे स्टाफ व दोन पंचासह वा दरम्यान मला वरोरा शहरातील महाकाली नगरी येथील खाली प्लट येथे येवुन 10.00 वा. भेटले. त्यानंतर त्यांनी मला डिजीटल व्हईस रेकर्डर व मेमरी कार्ड संबधाने पुन्हा माहीती देवुन लेखी तक्रारीत नमुदप्रमाणे गै.अ. चुक्का साहेब M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) जि. चंद्रपुर यांची माझ्या तिन्ही ग्राहकांच्या घरी विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावणे करीता त्यासाठी लागणारे डिमांड काढुन देण्याच्या कामाकरीता 6,000/-रुपये लाचेची खरोखरच मागणी आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करण्याचा सर्वानुमते निर्णय घेवुन त्यानंतर श्रीमती. भरडे मडम यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन पोक. रविकुमार ढेंगळे यांनी व्हईस रेकर्डर सुरु करुन व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकल क्र. MH-34 BK 3049 पंच क्र. 01 यांचेसह महावितरण (अर्बण) कार्यालय वरोरा (बोर्डा) जि.चंद्रपुर येथे पडताळणी करीता पाठविले असता पडताळणी दरम्यान गै.अ. चुक्का साहेब M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) यांनी मला रू.6,000/- घेवुन त्यांचे कार्यालय महावितरण (अर्बण) कार्यालय वरोरा (बोर्डा) जि.चंद्रपुर येथे घेवुन बोलाविले. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आले.त्यानंतर पो.नि.श्रीमती. भरडे,मडम यांनी पंच क्र. 01 व 02 यांचे समक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची फाईल ऐकुण गै.अ. चुक्का साहेब M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) यांनी मला माझ्या तिन्ही ग्राहकांच्या घरी विद्युत संच (सोलर सिस्टम) किट लावणे करीता त्यासाठी लागणारे डिमांड काढुन देण्याच्या कामाकरीता 6,000/-रुपये लाच रकमेची मागणी करुन थोडयाच वेळात लाच रक्कम 6,000/- रु. स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरुन गै.अ. चुक्का साहेब M.S.E.B. कार्यालय वरोरा (बोर्डा) यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातील दुपटटा काढुन चेहरा पुसुन डावे हातातच दुपटटा ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर पो.नि.श्रीमती. भरडे,मडम यांचे सुचनेवरुन पोक. रविकुमार ढेंगळे यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. 01 यांचेसह महावितरण (अर्बण) कार्यालय वरोरा (बोर्डा) जि.चंद्रपुर येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 महावितरण (अर्बण) कार्यालय वरोरा (बोर्डा) जि.चंद्रपुर कार्यालयाकडे गेलो असता त्या ठिकाणी गै.अ. चुक्का साहेब हे त्यांचे कार्यालयात हजर मिळुन आले नाही. त्यामुळे तेथील कार्यालयीन कर्मचारी यांना विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले कि, साहेब बाहेर गेले आहे त्यामुळे येण्यास किती वेळ लागेल माहिती नाही. असे सागीतल्याने मी नियोजीत ठिकाणी परत गेलो व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने परत आले आणि व्हईस रेकर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर आम्ही वरोरा शहरातील महाकाली नगरी येथील खाली प्लट येथे येवुन थांबुन राहलो. सायंकाळी अंदाजे 06.00 वा. मी महावितरण (अर्बण) कार्यालय वरोरा (बोर्डा) येथील कार्यालयीन फोनवर फोन करुन गै.अ. चुक्का साहेब हे कार्यालयात हजर आहे काय याबाबत विचारपुस केली असता तेथील कर्मचारी यांनी फोनवर सांगीतले कि, चुक्का साहेब लाईट शेट डउन झाले असल्यामुळे गेले आहे त्यामुळे कधी येणार माहिती नाही असे सांगीतले. त्यामुळे आजची सापळा कार्यवाही पो.नि.श्रीमती. भरडे,मडम यांनी स्थगीती ठेवण्यात सांगीतले. तसेच मला दि. 25/06/2022 व 26/06/2022 रोजी वैयक्तीक काम असल्यामुळे मला बाहेरगावी जायचे हाते त्यामुळे पुढिल सापळा कार्यवाही सोमवार दिनांक 27/06/2022 रोजी करण्याचे ठरविले. त्यानंतर मला दि. 27/06/2022 रोजी सकाळी 10.00 वा. वरोरा शहरातील महाकाली नगरी येथील खाली प्लट येथील नियोजित केलेल्या ठिकाणी हजर राहण्यास सांगुन ते आपल्या शासकिय वाहनाने स्टफ व दोन्ही पंचासह चंद्रपूर येथे निघुन गेले.त्यानंतर दिनांक 24/06/2022 रोजी ठरल्याप्रनाणे मी आज दिनांक 27/06/2022 रोजी 10:00 वा. सुमारास वरोरा शहरातील महाकाली नगरी येथील खाली प्लट येथे ठरलेल्या नियोजित ठिकाणी पोहचलो. लगेचच ला.प्र.वि.कार्यालय चंद्रपूर येथील श्रीमती. पो.नि. भरडे,मडम, दोन्ही पंच व स्टॉफ सह शासकिय वाहनाने नियोजित ठिकाणी पोहचले व मला भेटले. सदर फीर्याद मधील शब्द संख्या जास्त असल्याने व सी सी टी एन एस प्रणालीमध्ये मर्यादीत शब्द संख्या टंकलीखीत करता येत असल्याने उर्वरीत शब्द सी सी टी एन एस प्रणालीमध्ये सामील होत नसल्याने मुळ फीर्याद ही एफ आय आर सोबत जोडण्यात येत आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): DIPAK SOVINDA KHOBRAGADE(I (Inspector)) / POBN73119 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची)

Name (नाव): DIPAK SOVINDA KHOBRAGAD
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN73119

प्रथम खबरी दाखल अधिकारी
पोलीस स्टेशन वरोरा
HC दिवाकर ... 
न.1795 पो.स्टे. वरोरा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)